३६४

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड
क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र.झोपुप्रा./सप्रा१/टांगेवाला कॉ./ ५९६ /२०२१
दिनांक : २४ / ०५ /२०२१

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

## झोपडपट्टी पुनर्वसन आदेश

(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना)

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पुणे / पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद गाव पर्वती स.नं.८०, ८१, सि.स.नं.२१९२ ते २२१३, नविन सि.स.नं.२१९२/१ ते २१९२/१३ पैकी येथील टांगेवाला कॉलनी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या पूर्ण झोपडपट्टी अंदाजे क्षेत्रफळ ४,२४७.१६ चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर क्षेत्र असा करणेत येत आहे) हे क्षेत्र या प्राधिकरणाकडील पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.गंगा कंन्स्ट्रक्शन्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.२७/०२/२०२० रोजी झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे; आणि

ज्याअर्थी, सदरच्या क्षेत्रामध्ये झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती अस्तित्वात असल्याबाबत उपआयुक्त पुणे महानगरपालिका यांचा अहवाल जा.क्र.३/७१५० दि.०३/०२/२०२० या प्राधिकरणास दि.०४/०२/२०२० रोजी प्राप्त झालेला आहे; आणि

ज्याअर्थी, सदरच्या क्षेत्राची झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडील उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी यांनी समक्ष स्थळपाहणी करुन या क्षेत्रामध्ये झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असल्याचा दि.१८/०२/२०२० रोजीचा अहवाल सादर केला आहे; आणि म्हणून उक्त

अधिनियमातील कलम ३क च्या तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे आवश्यक आहे अशी माझी खात्री पटली आहे; आणि

ज्याअर्थी, दि.०५/११/२०२० रोजी आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने सदर मिळकतीवरील अपात्र ठरलेल्या लाभार्थींचे P.A.P. (Project Affected People) म्हणुन उपायुक्त परिमंडळ क्र.३ व उपायुक्त परिमंडळ क्र.५ तथा उपायुक्त ग.व.नि. यांचेमार्फत घोषित करुन त्यांचे पुनर्वसन याच मिळकतीमध्ये एस.आर.ए. मार्फत करणेत येणार असुन पुणे महानगरपालिकेने अशा अपात्र लाभार्थींचे P.A.P. (Project Affected People) म्हणुन पुनर्वसनाकरीता येणारा बांधकाम खर्च झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला दयावयचा आहे. तसेच, नाला गार्डन आरक्षणाचे संपुर्ण क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने विनामोबदला व निर्वेध पुणे महानगरपालिकेस दयावयाचे ठरले आहे; आणि

ज्याअर्थी, शहर अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दि.२९/०४/२०२१ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की,दि.२५/०९/२०१९ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे लगतच्या नाल्यास पुर येऊन सदर मिळकतीतील संपुर्ण झोपडपट्टी व ओपन स्पेस मध्ये पाणी गेले व त्यामुळे या झोपडपट्टीतील ०६ लोकांची जिवीतहानी झाली असुन इतर लोकांचे प्रचंड प्रमाणात वित्तहानी झाली असुन बेघर झाले आहेत. तसेच, लोकप्रतिनिधी / सभासद, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्या दि.१२/०४/२०२१ रोजीच्या पत्रानुसार नजिकच्या काळात पावसामुळे जिवीत व वित्तहानी होण्याची शक्यता नाकरता येणार नाही. सबब, सदर झोपडपट्टीचे पुनर्वसन होणे आवश्यक असलेचे कळविले आहे. उपरोक्त मिळकतीवरील झोपडयांचे पुनर्वसन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अंतर्गत करण्यासाठी मा.महापालिका आयुक्त यांचेकडे दि.०५/११/२०२० रोजी बैठक आयोजित करणेत आली होती. त्यानुसार अपात्र ठरलेल्या लाभार्थींचे पुनर्वसन त्याच मिळकतीमध्ये करण्याचे निश्चित करणेत आले असुन त्याबाबतची कार्यवाही सुरु करणेत आली आहे. तथापि, पावसाळया पुर्वी सदर झोपडपट्टीचे पुनर्वसन / स्थलांतर होणे आवश्यक आहे, असे पत्रामध्ये नमुद केले आहे; आणि

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३क मधील नमूद तरतूदीन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले हे क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

या प्राथमिक आदेशाद्वारे मालकी हक्क प्राप्त असलेले खाजगी व्यक्ती / शासकिय विभाग / सार्वजनिक प्राधिकरणे / स्थानिक संस्था यांना असे सूचित करीत आहे की, त्यानी उक्त क्षेत्र पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत त्यांची कोणतीही सूचना /आक्षेप/ हरकत असल्यास, ती सदरचा आदेश प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे - १६ या कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात आवश्यक ती कागदपत्रे आणि पुराव्यांसह सादर करावी. सबळ पुराव्याशिवाय दाखल केलेले तसेच विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही आक्षेप / हरकती / सूचना / दावे या कार्यालयाकडे स्विकारले जाणार नाहीत अथवा विचारात घेतले जाणार नाहीत याची जाणीव याद्वारे करून देण्यात येत आहे.

(३८०)

उपरोक्त विहीत मुदतीत मालकी हक्क प्राप्त असलेल्या खाजगी व्यक्ती / शासकिय विभाग / सार्वजनिक प्राधिकरणे / स्थानिक संस्था यांचेकडून प्राप्त आक्षेप / हरकती / सूचना / दावे यावर त्यांना म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल. त्यांचे म्हणणे व दाखल केलेले कागदपत्र आणि पुरावे विचारात घेऊन उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) अन्वये सदरचा आदेश कायम करण्याबाबत व अधिसूचनेमध्ये समाविष्ट क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

## अनुसूची

झोपडपट्टीचे नाव : टांगेवाला कॉलनी
महानगरपालिका क्षेत्र : पुणे

<table>
<tr><th>गाव</th><th>स.नं.</th><th>जमीनीचे मालकी हक्क / विकसन हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव</th><th>क्षेत्र (चौ. मी.) पूर्णत:</th><th>चतु:सिमा</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>१</td><td>२</td><td>३</td><td>४</td><td>५</td><td>६</td></tr>
<tr><td rowspan="4">पर्वती</td><td rowspan="4">स.नं.८०, ८१, सि.स.नं.२१९२/१ ते २१९२/१३ पैकी</td><td rowspan="4">महाराष्ट्र शासन पट्टेधारक टांगेवाला सहकारी गृहरचना संस्था मर्या.<br>विकसन हक्क - मे.गंगा कंन्स्ट्रक्शन्स</td><td rowspan="4">४,२४७.१६ चौ.मी.</td><td>पुर्वेस - लागु आंबिल ओढा</td><td rowspan="4"></td></tr>
<tr><td>पश्चिमेस - लागु रस्ता व टांगेवाला सहकारी गृहरचना संस्था</td></tr>
<tr><td>दक्षिणेस - लागु रस्ता</td></tr>
<tr><td>उत्तरेस - लागु न.भु.क्र.२०७८</td></tr>
</table>

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :-२८ /०५ /२०२१

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

19.5.2021

राजेंद्र निंबाळकर (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत :- रजि. पोस्ट द्वारे
१. विकसक मे. गंगा कंन्स्ट्रक्शन्स, रा.सन माहु कॉम्पेल्क्स, ३ रा मजला, बंड गार्डन रोड, पुणे - ४११००१
२. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
३. I. टांगेवाला सहकारी गृहरचना संस्था-A, टांगेवाला कॉलनी, अरण्येश्वर, पर्वती, पुणे
II. टांगेवाला सहकारी गृहरचना संस्था-B, टांगेवाला कॉलनी, अरण्येश्वर, पर्वती, पुणे
III. टांगेवाला सहकारी गृहरचना संस्था-C, टांगेवाला कॉलनी, अरण्येश्वर, पर्वती, पुणे

आपले लक्ष उक्त अधिनियमाच्या सुधारित कलम ३ क कडे वेधण्यात येत आहे. उक्त आदेश अंतिम करण्यात आल्यानंतर या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना

राबविण्यासाठी आपल्या अथवा आपल्या विभागाच्या वेगळ्या संमती अथवा ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही. खाजगी क्षेत्राचे बाबतीत विकसकाकडे मालकी / विकसन हक्क नसल्यास ते क्षेत्र उक्त अधिनियमामधील प्रकरण पाच मधील तरतूदींन्वये संपादित करण्यात येईल तसेच अशा शासकिय / निमशासकिय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मालकिच्या तसेच संपादित खाजगी क्षेत्राचा मोबदला उक्त अधिनियमाच्या कलम १७ मधील तरतूदीनुसार निर्धारित करण्यात येईल इतका अनुज्ञेय असेल.

४. उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र १, झोपुप्रा पुणे यांना सूचित करण्यात येते कि या आदेशाच्या प्रती योजनाक्षेत्र / झोपडपट्टी क्षेत्रात डकवून प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रसिद्धी अहवाल प्रकरणात समाविष्ट करण्यात यावा .

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी

१. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना गवनि / झोनिपू / बांधकाम विभागाचे माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
२. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
वरिल आदेश महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करून त्याच्या ५ प्रति या कार्यालयास देयकासह पुरविण्यात याव्यात हि विनंती.